27-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/26/2025 9:30 PM Page 1

निवडक

भ्रष्टाचार व खंडणीप्रकरणी सहा आरोग्य अधिकाऱ्यांचे निलंबन

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २६ : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत भ्रष्टाचार व ब्लॅकमेलिंगप्रकरणी गंभीर आरोप झाल्यानंतर, आरोग्य विभागाने तात्काळ कारवाई करत दोन आरोग्य अधिकारी आणि चार स्वच्छता निरीक्षकांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. आरोग्य मंत्री विश्वजित राणे यांनी यासंदर्भात माहिती दिली.

शनिवारी आरोग्य सेवा संचालनालय सोबत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर ही कारवाई जाहीर करण्यात आली. या बैठकीत सहा अधिकाऱ्यांवर भ्रष्ट कारवाया व खंडणीप्रकरणी विश्वसनीय पुरावे समोर आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे त्यांच्याविरोधात निलंबनाची प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात आली आहे.

निलंबनाची प्रक्रिया सध्या सुरू असून, येत्या आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांची नावे अधिकृतरित्या जाहीर केली जातील, असे राणे यांनी सांगितले.आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी सरकारने 'शून्य सहिष्णुता' धोरण राबवले असून, ही कारवाई त्याचाच एक भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोणताही अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करताना आढळल्यास कठोर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल, असा इशाराही राणे यांनी दिला.

राणे यांनी यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या एका अन्न निरीक्षकाविरुद्धही भ्रष्टाचाराच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर कारवाई सुरू करण्यात आल्याचे सांगितले. सरकारी सेवेत भ्रष्टाचार करणाऱ्यांना कोणतीही सहानुभूती नाही. असे अधिकारी सेवेत राहण्यास अपात्र आहेत, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. यापूर्वी राणे यांनी बांबोळी येथील गोवा वैद्यकीय महाविद्यालयात विविध विभागप्रमुखांसोबत बैठक घेतली. यामध्ये विभागीय कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच राज्यात कीटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेतला गेला.आरोग्य विभाग आणि जीएमसी मधील तज्ज्ञांसोबत आम्ही एक व्यापक कृती आराखडा तयार करत आहोत. राज्यातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळाव्यात, हे आमचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे, असे राणे म्हणाले.

तसेच, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या कीटकजन्य आजारांमुळे उद्भवणाऱ्या आरोग्य संकटांचा वेळीच सामना करण्यासाठी अधिक गतिमान आणि प्रतिसादक्षम यंत्रणा उभारण्याचा विचारही या बैठकीत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.प्रत्येक विभागाच्या गरजा आणि सध्याच्या सुविधांची समज प्राप्त करून, आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही उपाय शोधत आहोत, असेही राणे यांनी स्पष्ट केले.

आसगाव ग्रामसभेत
रस्ता रुंदीकरणावरून वाद

■ टीम दैनिक हेराल्ड

आसगाव, दि. २५ : रविवारी झालेल्या आसगाव ग्रामसभेत रस्ता रुंदीकरण, कोमुनिदाद जमीन झोनबदल आणि अपूर्ण जलशुद्धीकरण प्रकल्प या प्रमुख विषयांवर ग्रामस्थ आणि पंचायत प्रशासनात जोरदार वाद झाला .

ग्रामस्थांनी २५ मीटर रुंदीच्या प्रस्तावित मुख्य रस्त्याला कडाडून विरोध केला. असे अवाजवी रुंदीकरण मेगा प्रकल्पांना आणि वाढत्या वाहनांना सोयीचे ठरेल ; पण गावाची पारंपरिक ओळख नष्ट करेल, असे रणजित पार्सेकर म्हणाले. २५ मीटर रस्ता अनिवार्य करणारी प्रादेशिक योजना त्वरित रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. शिवोली –हणजूण परिसरातल्या मनमानी भिंत पाडकामाची पुनरावृत्ती आमच्या गावात होऊ देणार नाही,असा इशाराही उपस्थित ग्रामस्थांनी दिला.सुरुवातीच्या चर्चांनंतर सभेने ठरवले की संभाव्य रस्ता सुधारणा सर्व ग्रामस्थांचा विश्वास संपादन करूनच केली जाईल.

सुमारे २ लाख चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कोमुनिदाद मालमत्ता क्र. १०१/१ मध्ये क्लस्टर झोन' परिवर्तन हे अनेक कोटींचा घोटाळा असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. झोन बदलल्यास टेकड्या उध्वस्त होतील, आणि भविष्यात पाणीटंचाई उभी राहील, असा इशारा सुरेंद्र गाड यांनी दिला. या भूमिकेला आइन्स्टाइन बॅरेटो, ॲलेक्स रॉड्रिग्ज आदी ग्रामस्थांनी पाठिंबा दिला.

नुकताच हॉटमिक्स केलेला मुख्य रस्ता वारंवार खोदला जात असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप उसळला. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पाइपलाइन सतत फुटत आहेत ; लाभ मात्र कोणालाच मिळालेला नाही, असा आरोप आइन्स्टाइन बॅरेटो यांनी केला आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची दक्षता चौकशी करण्याची मागणी केली.

सरपंचांनी ग्रामस्थ, पंचायत आणि संबंधित सरकारी विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन तातडीचे प्रश्न मार्गी लावणार असे स्पष्ट केले. यावेळी पंचायतने सुमारे रु. ४ कोटींचे वार्षिक बजेट मंजूर करताना स्वनिधीसाठी काही सेवाकर वाढीचे पर्यायही सूचित केले असल्याचे त्यांनी स्मरण करून दिले.

कुर्टी-खांडेपारमध्ये अतिक्रमणविरोधी मोहीम सुरूच

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २६ : कुर्टी–खांडेपार ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सलग दुसऱ्या दिवशीही सुरू राहिली. या मोहिमेअंतर्गत सोमवारी ग्रामपंचायतीने धाडसी पाऊल उचलत माजी सरपंच गुरुदास खेडेकर यांच्या बेकायदेशीर शेडवर बुलडोझर चालवला.

गेल्या शुक्रवारी झिंगाडीमाळ, कुर्टी येथील पंचायत जागेवर उभारलेले दामू नाईक यांचे चिकन शॉप, भाडेपट्ट्याच्या खोल्या आणि कार्यशाळा अशा स्वपातील अतिक्रमणे हटविण्यात आली होती. याच परिसरातील दुसऱ्या एका भागात खेडेकर यांनी उभारलेले शेडही पंचायत मालकीच्या जागेत असल्याची स्पष्ट झाल्यानंतर तातडीने कारवाई करत ते बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.

या कारवाईत सरपंच नीलकांत नाईक, पंच सदस्य भिका केरकर व ग्रामपंचायतीचे पथक सहभागी झाले होते. पंचायत अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अतिक्रमणविरोधी ही मोहीम पुढील काही दिवस सुरू राहणार आहे.

दरम्यान, यासंदर्भात विचारणा केली असता, माजी सरपंच गुरुदास खेडेकर यांनी आपले आणि भिका केरकर यांच्यात कोणतेही वैयक्तिक शत्रुत्व नसल्याचे सांगितले. मी फक्त त्यांच्या बेकायदेशीर बांधकामांविरोधात याचिका दाखल केली होती, जी सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, असे खेडेकर म्हणाले.

उल्लेखनीय म्हणजे, खेडेकर यांनीच काही महिन्यांपूर्वी भिका केरकर यांच्याविरोधात बेकायदेशीर बांधकाम केल्याच्या आरोपावरून अपात्रतेची याचिका दाखल केली होती. प्रारंभी बीडीओ कार्यालयाने केरकर यांना अपात्र ठरवले होते, मात्र न्यायालयाने त्या निर्णयाला स्थगिती देत त्यांना पंच सदस्यपदावर कायम ठेवले.

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना पंच सदस्य भिका केरकर म्हणाले की, गुरुदास खेडेकर यांनी सरपंच असताना पंचायत जागेवर तळमजला आणि पहिला मजला उभारून अतिक्रमण केले. पंचायतच्या अतिरिक्त संचालकांनी अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीने यापुढेही अतिक्रमणविरोधी मोहीम सातत्याने राबवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

कोविडच्या पार्श्वभूमीवर दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाची तयारी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : शेजारील राज्यांमध्ये पुन्हा एकदा कोविड–१९ रुग्णांची नोंद होऊ लागली असून, गोव्यातही अलीकडेच एक रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर, दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाने संभाव्य प्रसार रोखण्यासाठी आवश्यक खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत.

याबाबत अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे अद्याप आरोग्य सेवा संचालनालयाकडून प्राप्त झाली नसली, तरीही रुग्णालय प्रशासनाने कोणतीही अडचण उद्भवू नये यासाठी तयारी सुरू केली आहे. दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र बोरकर यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना सांगितले की, सद्यस्थितीत आरोग्य संचालनालयाकडून कोणतेही अधिकृत निर्देश प्राप्त झालेले नाहीत. मात्र, कोविडविषयक खबरदारीचे सर्व आवश्यक उपाय राबविण्याच्या दृष्टीने आम्ही पूर्णतः सज्ज आहोत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालय प्रशासनाने ताप, खोकला, श्वास घेण्यास त्रास अशा फ्लूजन्य लक्षणे असलेल्या रुग्णांची तपासणी आणि देखरेख यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. याशिवाय, रुग्णालयात कार्यरत वैद्यकीय आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना सतर्कतेचे निर्देश देण्यात आले आहेत. अंतर्गत यंत्रणा तपासण्याच्या अनुषंगाने, पीपीई किट्सचा साठा, सॅनिटायझेशन साहित्य आणि ऑक्सिजन पुरवठा व्यवस्था यांचाही आढावा घेतला जात आहे.

कोविडच्या आधीच्या लाटांदरम्यान दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाने प्रभावी व्यवस्थापनाचे उदाहरण स्थापीत केले होते. शेकडो रुग्णांवर यशस्वी उपचार, आयसोलेशन वॉर्डची तत्काळ उभारणी आणि कठोर खबरदारी उपायांची अंमलबजावणी करत रुग्णालयाने राज्याच्या आरोग्य यंत्रणेला भक्कम साथ दिली होती.

रुग्णालय प्रशासन स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्कात राहून परिस्थितीचा सतत आढावा घेत आहे. सार्वजनिक सुरक्षेला आमची सर्वोच्च प्राधान्यता आहे. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि सरकारकडून सूचना मिळताच आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे डॉ. बोरकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, नागरिकांनी जागरूक राहावे, स्वच्छतेच्या नियमांचे पालन करावे आणि केवळ अधिकृत आरोग्य बुलेटिनवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

सध्या गोव्यातील परिस्थिती नियंत्रणात असली तरी, आरोग्य यंत्रणा आणि दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालय संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी सतर्क आहेत आणि गरज भासल्यास तात्काळ प्रतिसाद देण्यास सिद्ध आहेत.

आदिवासी भवन प्रकरणी स्वतंत्र चौकशीची सिल्वा यांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : आदिवासी भवन प्रकल्पाच्या उशीर व त्यात झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या पार्श्वभूमीवर वेळ्ळीचे आमदार क्रूझ सिल्वा यांनी सरकारकडे या प्रकरणाची स्वतंत्र व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी अलीकडेच केलेल्या गंभीर वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना सिल्वा यांनी ही भूमिका मांडली.

मंत्री गावडे यांनी यापूर्वी केलेल्या वक्तव्यात आदिवासी कल्याण विभागातील अधिकाऱ्यांवर थेट लाचखोरीचे आरोप करत स्वतःच्या सरकारवरच टीकेची झोड उठवली होती. काही अधिकारी फायली पुढे सरकवण्यासाठी कंत्राटदारांकडून लाच घेत असल्याचा गावडे यांचा दावा आहे. या विधानांचा दाखला देत आमदार सिल्वा म्हणाले की, या गंभीर आरोपांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आदिवासी भवन प्रकल्पात झालेल्या विलंब व भ्रष्टाचाराच्या मुळाशी जाण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे.त्यांनी स्पष्ट केले की आदिवासी समाजाला मूलभूत पायाभूत सुविधा व न्याय मिळण्यासाठी फार काळ थांबावे लागत आहे, आणि या प्रश्नांकडे आता दुर्लक्ष करून चालणार नाही.

आमदार सिल्वा यांनी आदिवासी कल्याण योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची गरज अधोरेखित केली. अनेक योजना कागदावरच राहतात. आदिवासी समाजासाठी केवळ घोषणांची गरज नाही, तर ठोस कृती आवश्यक आहे. प्रत्येक स्तरावर उत्तरदायित्व असले पाहिजे, असे ते म्हणाले. त्यांनी यावेळी गोव्यातील अनुसूचित जमाती (एसटी) समुदायाच्या सत्ताकेंद्रातील दुर्लक्षित स्थितीवरही प्रकाश टाकला. घटनात्मक संरक्षण असूनही आणि विविध सरकारांनी वेळोवेळी आश्वासने दिली असतानाही आदिवासी समुदायाच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार सिल्वा यांनी गोवा विधानसभेत अनुसूचित जमातींसाठी आरक्षित जागांची मागणी पुन्हा जोरात मांडली. २०१७च्या निवडणुकीतही हा मुद्दा चर्चेत होता. आजतागायत आदिवासी समाजाला विधानसभा पातळीवर योग्य प्रतिनिधित्व मिळालेले नाही. ही स्थिती अधिक काळ सहन केली जाणार नाही, असा ठाम इशारा त्यांनी दिला.सध्या राज्यातील अनेक आदिवासी नेते व कार्यकर्ते शासनाच्या पद्धतशीर दुर्लक्ष, समर्पित पायाभूत सुविधांचा अभाव आणि निर्णय प्रक्रियेत अपुऱ्या सहभागावर नाराजी व्यक्त करत आहेत. अशा पार्श्वभूमीवर आमदार सिल्वा यांनी केलेली ही मागणी राज्य सरकारसमोरील गंभीर आव्हान ठरू शकते.

फाल्कन इमारतीजवळील मार्ग सीसीपीकडून बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

व्यापाऱ्यांचा व्यवसाय थांबवण्याचा निर्णय

पणजी, दि. २६ : पणजी महानगरपालिकेने शनिवारी फाल्कन अपार्टमेंटजवळील असुरक्षित घोषित केलेल्या महानगरपालिकेच्या इमारतीकडे जाणारा मार्ग बंद केला. या कारवाईमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, त्यांनी सक्षम प्राधिकरण अर्थात नगरविकास मंत्र्यांच्या निर्णयाची वाट पाहत तात्पुरते स्वरूपात आपले व्यवसाय बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

या इमारतीत व्यवसाय सुरू असलेल्या १३ दुकानांपैकी १० दुकानदारांनी गोव्यातील मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मागे घेतली असून, त्यांनी शुक्रवार रात्रीपासून आपले व्यावसाय तात्पुरते बंद केले आहेत. न्यायालयात त्यांनी नमूद केले की, नगरविकास मंत्र्यांकडे दाखल केलेल्या अपील व स्थगिती अर्जाच्या सुनावणीत (२७ मे) होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहूनच ते त्यांच्या युनिट्सवर ताबा ठेवणार आहेत.

दुकानदारांच्या वतीने ॲड. सी. पाडगावकर यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, सक्षम प्राधिकरणाकडे केलेल्या अपीलावर निर्णय घेण्यासाठी त्या दिवशी कोणताही पीठासीन अधिकारी उपलब्ध नव्हता. त्यामुळे दुकानदारांसमोर पर्याय नसल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, आता त्यांनी आपली याचिका मागे घेत अपील प्रक्रियेवर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. न्यायालयाने आदेश देताना नमूद केले की, उर्वरित तीन दुकानदारांनी जर महानगरपालिकेच्या आदेशाचे पालन केले नाही, तर महानगरपालिका २१ मे २०२५ च्या निष्कासन आदेशाची अंमलबजावणी करू शकते.

दरम्यान, शनिवारी महानगरपालिकेने संबंधित इमारतीच्या दोन्ही बाजूचे रस्ते बंद केल्याने, समोरील स्टॉल्स चालवणाऱ्या सुमारे १७ अन्य विक्रेत्यांनाही मोठा फटका बसला आहे. सीसीपीचे मार्केट निरीक्षक वीरेंद्र महाले यांनी या दोन्ही बाजूचे रस्ते बंद राहणार असल्याचे स्पष्ट केले.

कमल केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्टचे मालक आर. एन. कमल' रेंजेन यांनी म्हटले आहे की, आम्ही स्वेच्छेने आपला व्यवसाय थांबवला आहे, अशा परिस्थितीत सीसीपीने मार्ग बंद करण्याचे नाटक करण्याचे कारण काय? आम्ही गेल्या ५५ वर्षांपासून येथे व्यवसाय करत आहोत. आम्हाला फक्त २४ तासांत परिसर रिकामा करण्याची सूचना देणे अन्यायकारक आहे. आम्ही सीसीपीला सहकार्य करत आहोत. आमचे अपील प्रलंबित असताना त्यांनी आम्हाला पर्यायी ठिकाण उपलब्ध करून द्यावे. जर इमारत खरोखर असुरक्षित असेल तर आम्ही ती रिकामी करू, पण उपजीविकेसाठी पर्याय दिला पाहिजे.

यावेळी इमारतीतील सर्व १३ दुकाने बंद असली तरी, समोरचे काही तात्पुरते स्टॉल्स उघडे होते. यातील बहुतांश दुकानांमध्ये सब–लेट पद्धतीने व्यवहार केला जात असल्याचे दिसून आले.

असुरक्षित इमारतीसमोर माताजी मोबाईल विक्री व सेवा केंद्र चालवणारे रवींद्र म्हणाले की, हे दुकान मी केवळ १० महिन्यांपूर्वी भाड्याने घेतले आहे. आता रस्ता बंद आणि इमारत पाडल्यास आम्हालाही व्यवसाय बंद करावा लागेल.

मिठाई मार्ट'चे मालक प्रगम राम बोराणा गेल्या १७ वर्षांपासून इथे व्यवसाय करत आहेत. त्यांनी याविषयी कोणतेही वक्तव्य देण्यास नकार दिला, तर रेडीमेड कपड्यांचे दुकान चालवणारे मुन्ना यांनी सांगितले की, मी नुकतेच ६ महिन्यांपूर्वी येथे व्यवसाय सुरू केला असून, सध्या काय करावे याबद्दल संभ्रमात आहे. या सगळ्या परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना पणजीतील रहिवासी ॲथनी फर्नांडिस म्हणाले, महानगरपालिकेने इमारत असुरक्षित असल्याचा निर्णय घेतला असेल, तर त्यांनी संबंधित दुकानदारांना स्थलांतराची सुविधा द्यावी. केवळ विस्थापन करणे हा जर सीसीपीचा उद्देश असेल, तर तो नक्कीच अन्यायकारक आहे.

दक्षिण गोव्यात अवकाळी पावसाचा फटका

भातशेतीचे मोठे नुकसान, शेतकऱ्यांचे हाल

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : मे महिन्याच्या अखेरीस झालेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे दक्षिण गोव्यातील अनेक भागांत भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. वेंगुर्ला, चांदोर, वेळ्ळी व इतर परिसरांतील शेकडो शेतकऱ्यांच्या हातातील पीक वाया गेले असून, पावसामुळे सखल भागांमध्ये शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत.

वेळ्ळी गावातील शेतकरी गिरदोलिना फर्नांडिस यांनी सांगितले की, पेरणीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच त्यांच्या दोन जमिनींमध्ये जवळपास ३० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. स्थानिक प्रशासन व कृषी विभागाकडे वेळेवर बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची मागणी करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. शेतात काम करणाऱ्या माझ्या वृद्ध आईला हे नुकसान पाहून मोठे दुःख झाले, असे त्या म्हणाल्या. कृषी विभागाने मदतीचे आश्वासन दिले असले, तरी अद्याप प्रत्यक्षात काही ठोस उपाय झालेले नाहीत.

चांदोर – असोल्डा परिसरातील शेतकरी झेवियर फर्नांडिस यांनीही मोठ्या नुकसानीची माहिती दिली. मान्सूनपूर्व पावसापासून बचावासाठी त्यांनी भातशेतीची लवकर पेरणी केली होती. मात्र, अकस्मात आलेल्या पावसामुळे भात कापणीपूर्वीच भिजल्याने सुमारे ५० हजार ते ६० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. अकाली पावसामुळे भाताच्या दाण्यांना अंकुर फुटणे, रंग बदलणे आणि उत्पादनात मोठी घट होणे हे प्रत्येक शेतकऱ्यासाठी भीषण स्वप्न ठरत आहे, असे फर्नांडिस म्हणाले.

कृषी विभागाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विशेष सर्वेक्षण सुरू केले आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनुसार, सांगे, केपे आणि काणकोण तालुक्यातील सुमारे १० हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे. विशेषतः कापणीच्या टप्प्यावर असलेल्या भातशेतीला मोठा फटका बसला आहे. सततच्या पावसामुळे काही शेतकरी अजूनही त्यांच्या शेतात प्रवेश करू शकलेले नाहीत. अधिकाऱ्यांनी इशारा दिला आहे की, पावसाचा कालावधी वाढल्यास पिकांचे अपरिवर्तनीय नुकसान होण्याची शक्यता आहे.

सासष्टी परिसरात अनेक शेतकऱ्यांनी पावसाआधीच कापणी पूर्ण केली आहे. मात्र, चांदोरसारख्या भागात पेरणी उशिरा झालेल्यांना पावसाचा फटका बसला असून, सुमारे १० ते १५ हेक्टर जमीन अद्याप पाण्याखाली आहे. वेळ्ळीसारख्या भातशेतीसाठी प्रसिद्ध गावांनाही पूरस्थितीला सामोरे जावे लागले, मात्र अधिकाऱ्यांनी सांगितले की खरीप हंगामासाठी सुरू असलेल्या पूर्वतयारीमुळे संभाव्य नुकसान काही अंशी टळले आहे.

पुढील काही दिवसांत आणखी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतकरी अधिकच चिंतेत आहेत. जरी काही शेतीत माती मऊ झाल्यामुळे पुढील नांगरणीसाठी मदत होऊ शकते, असे तज्ज्ञ सांगत असले तरी, आधीच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी भरपाई व तातडीच्या मदतीचा विषय अधिक महत्त्वाचा ठरत आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या 'गोयचे फुडले पिळगे खातीर' (जीएफपीके) या संस्थेने हवामानातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या असुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली आहे. जीएफपीकेचे अध्यक्ष जॅक मस्कारेनहास यांनी सांगितले की, राज्याच्या कृषी धोरणावर स्थानिक पातळीवर चर्चा घडवून आणताना त्यांनी कृषी मंत्र्यांसमोर सेंद्रिय शेती, जल व्यवस्थापन, जमीन वापराचे नियमन व पशुपालनासारख्या उपाययोजना सुचवल्या आहेत. जीएफपीकेने शासनाकडे झेवियर व गिरदोलिना फर्नांडिस यांच्यासारख्या शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देण्याची मागणी केली असून, भविष्यातील संकटांना टाळण्यासाठी वेळीच हस्तक्षेप, पारदर्शकता आणि स्थानिक नियोजनाची गरज अधोरेखित केली आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर गोव्यातील कृषी व्यवस्थेची लवचिकता ही सक्रिय प्रशासन आणि शाश्वत पाठिंब्यावरच अवलंबून असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

वारंवार वीजपुरवठा खंडित होण्यावर ग्रामस्थ संतप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : चिंचिणी, धर्मापूर –शिरली आणि सारझोरा येथील रहिवाशांनी वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे, ज्यामुळे दैनंदिन जीवन आणि आवश्यक सेवांमध्ये व्यत्यय येत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तीन ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींनी अलीकडेच आके – मडगाव येथील कार्यकारी अभियंत्यांची भेट घेतली आणि या समस्येवर त्वरित आणि प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली.

चिंचिणी –देवसू गाव पंचायतीचे सरपंच फ्रँक व्हिएगस म्हणाले की, सतत वीजपुरवठा खंडित होणे ही रहिवाशांसाठी एक मोठी समस्या बनली आहे. या वीजपुरवठा खंडित होण्यामुळे केवळ घरे आणि व्यवसायांवर परिणाम होत नाही तर अत्यावश्यक सेवांमध्येही अडथळा निर्माण होत आहे. पावसाळ्यात, जेव्हा विद्युतप्रवाह अधिक वारंवार होतात, तेव्हा परिस्थिती आणखी बिकट होते, असे ते म्हणाले.

व्हिएगस यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची गरज अधोरेखित केली, विशेषतः रात्रीच्या वेळी. त्यांनी आपत्कालीन दुरुस्तीसाठी समर्पित वाहन आणि शिडीची मागणी देखील केली आणि वीजवाहिन्यांचे नुकसान टाळण्यासाठी नियमित झाडे छाटण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

त्यांनी निदर्शनास आणून दिले की चिंचिणी येथील वीज विभाग चिंचिणी –देवसू, धर्मापूर, शिरली आणि सारझोरा यासारख्या मोठ्या क्षेत्राला सेवा पुरवतो, ज्यामुळे मर्यादित कर्मचाऱ्यांवर आणि संसाधनांवर मोठा भार पडतो.

धर्मापूर –शिरलीच्या उपसरपंच अविता वाज यांनी वीज खंडित होण्याच्या काळात, विशेषतः रात्रीच्या वेळी ग्रामस्थांना येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. विद्युत पुरवठा खंडित होणे ही एक मोठी गैरसोय आहे, विशेषत: जेव्हा तक्रारींना प्रतिसाद देण्यासाठी रात्रीच्या वेळी कर्मचारी उपलब्ध नसतात. यामुळे वीज पुनर्संचयित करण्यात बराच विलंब होतो, ज्यामुळे रहिवाशांच्या रोजीरोटीवर आणि सुरक्षिततेवर परिणाम होतो, त्या म्हणाल्या.

वाझ यांनी वीज विभागाला त्यांच्या रात्रीच्या शिफ्ट टीमला बळकट करण्याची आणि ड्रामापूरला एक समर्पित सेवा वाहन नियुक्त करण्याची विनंती केली.पावसाळा जवळ येत असताना प्रतिसाद वेळ सुधारणे आणि सध्याच्या टीमवरील दबाव कमी करणे आवश्यक आहे,असे त्या पुढे म्हणाल्या.

चांगल्या पायाभूत सुविधा आणि जलद प्रतिसाद यंत्रणेच्या मागणीत दोन्ही पंचायती एकजुटीने आहेत. ग्रामस्थांना आशा आहे की परिस्थिती बिघडू नये म्हणून वीजविभाग जलदगतीने कारवाई करेल, विशेषतः पावसाळ्यात जेव्हा सुरक्षितता आणि दैनंदिन जीवनासाठी अखंड वीजपुरवठा महत्त्वाचा असतो.

E-mail: info-pondamc.goa@nic.in
Web portal: https://goaulbservice.gov.in/
Mobile: 8605007500

PONDA MUNICIPAL COUNCIL
PONDA - GOA

No. PMC/ADMN/648/2025-26 Date: -26/05/2025

WALK IN INTERVIEW

Walk in interview on 29/05/2025 vide notice no PMC/ADMN/647/2025-2026 dated 26/05/2025 for engagement of 30 daily wage labourers under Disaster Management has been issued and displayed on Notice Board for information of eligible applicants for more details contact Administration section of this Council.

Seen
Sd/- **(Anand P. Naik)**
Chairperson

SEAL

Sd/-
(Suyash Sinai Khandeparkar)
Chief Officer